## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.२६/०५/२०१८

## दि.२५/०५/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सांगवी पो स्टे २५५/१८,भादविक २७९,३३८,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,१३२(१)(क),१७९, ११९/१७७ |
| **फिर्यादी** | राजेंद सायकर,वय २७ वर्षे,रा.बाणेर,पुणे |
| **आरोपी** | खाजगी बसवरील अज्ञात चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/०५/२०१८ रोजी दुपारी ०१/०० वा.चे सुमारास सांगवी फाटा ,पुणे. |
| **तपशिल** | अज्ञात इसमाने त्याचे ताब्यातील खाजगी बस ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने, अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी यांची आई नामे- वस्तलागाई किसन सायकर,वय-६५ वर्षे,रा.सावतामाळी मंदीराजवळ बाणेर पुणे हया सांगवी फाटा येथे पायी पायी रस्ता क्रॉस करीत असताना त्यांना जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून, त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन, अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. डी. टी. पवार ८८३०८८८१८३ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | एमआयडीसी पो स्टे १६८/१८,भादविक २७९,३०४(अ),३३७,३३८,मोव्हेॲक्ट १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | रिंटु विश्वास, वय २४ वर्षे,रा.मोशी,पुणे |
| **आरोपी** | रमेश नागनाथ टिकोळे, वय २४ वर्षे,रा.संजय गांधीनगर,बो-हाडेवाडी,मोशी,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२४/०५/२०१८ रोजी सायं.०५/१५ वा.चे सुमारास आळंदी रोडवर मोशी, ता.हवेली,जि.पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे टाटा ४०७ या टेम्पो मध्ये मालक नामे मुकेशभाई पटेल, यांनी सांगितले प्रमाणे सेन्ट्रींगच्या प्लायवुड (फळया) भरुन फिर्यादी, त्यांचे साथीदार प्रकाश साणा, अजयकुमार धुरु, गणेश कृष्ण दास असे सदर टेम्पोमध्ये बसुन च-होली गावाकडे आळंदीरोडने चालवत घेवुन जात असताना, टेम्पोवरील चालक यातील नमुद इसम नामे रमेश टिकोळे याने त्याचे ताब्यातील टेम्पो हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी रोडवर डिव्हायडरला धडकुन,टेम्पो पलटी होवुन,फिर्यादी, अजयकुमार धुरु, प्रकाश साणा या तीघांना गंभीर जखमी करुन, गणेश कृष्ण दास, वय ३२ वर्षे, यास गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. ई.डी.जगदाळे ९४२३३८९२१७ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दिघी पो स्टे १४०/१८,भादविक ४५४,३८० |
| **फिर्यादी** | नरेंद्र शर्मा, वय ५० वर्षे,रा.बोपखेल,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/०५/२०१८ रोजी सकाळी ०८/०० वा.ते दु.०२/०० वा.चे दरम्यान कल्पतरु रेसिडन्सी, फ्लॅट नं.१०३, रोड नं.९ गणेशनगर बोपखेल,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरुम मधील कपाटातील रोख रक्कम ४ लाख रुपये व सोन्याचे दागिने असा एकुण ४ लाख ४५ हजार रुपये किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. पी.ए.कदम ८३०८९९६००७ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दत्तवाडी पो स्टे २०७/१८,भादविक ४२०,४६७,४६८,४७१,सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६(सी) |
| **फिर्यादी** | शिवानी कुलकर्णी,वय २२ वर्षे,रा.शनिवार पेठ,पुणे |
| **आरोपी** | १)हर्षद यादव २)अनुज कुमार ३)एक अनोळखी महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १९/०६/२०१७ रोजी सकाळी ११/०० वा.पासुन ते दिनांक २३/०६/२०१७ पर्यत विश्रामकुटी शनिवार पेठ, पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता. वेळी व ठिकाणी,यातील नमुद इसम व अनोळखी महिला यांनी फिर्यादी यांना एच.सी.एल. कंपनीत नोकरीचे आमिष दाखवून वेगवेगळया कारणासाठी फिर्यादीकडून ५,०००/- रुपये ऑनलाईन घेवुन व फिर्यादी यांचे काका सतीश मारुलकर,रा.बी/ १८ विजयाश्री टॉवर्स दत्तवाडी पुणे यांचे पॅनकार्ड व आधारकार्ड पाठवण्यास सांगुन त्या कागदपत्राचा गैरवापर करुन कोटक महिंद्रा बॅकेत काकांच्या संमंशिवाय त्यांच्य नावाने बँक खाते उघडून त्या खात्यावर व्यवहार केले आहेत. नमुद इसम व महिला यांनी इंटरनेटच्या माध्यमातून संगणकाचा वापर करुन, फिर्यादीकडे कागदपत्राची मागणी करुन व नोकरीचे आमिष दाखवून फिर्यादी ची ५,०००/- रु. ची आर्थिक फसवणुक व फिर्यादीच्या काकांची त्यांच्या संमंतिशिवाय बॅकेत खाते उघडुन त्यावर गैर व्यवहार करुन त्यांची ही फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) इंदलकर ९८८१५७२६०३ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | निगडी पो स्टे ३६१/१८,भादविक ४०६,४२० |
| **फिर्यादी** | सचिन मोरे, वय ३८ वर्षे,रा.चिंचवड,पुणे |
| **आरोपी** | एक इसम, वय अंदाजे ७० वर्षे,रा.वारजे,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | मे २०१६ ते आजपर्यंत पुर्णानगर चिंचवड पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने मी नॉन बॅकिंग फायनाशियल कॉर्पोरेशन फायनान्स कंपनी दिल्ली या कंपनीचा ब्रोकर असल्याचे सांगुन, फिर्यादी यांना तुम्ही आर्थिक गुंतवणूक करा,तुम्हांला एका वर्षामध्ये तुमची रक्कम नफयासह दुप्पट करुन देतो असे सांगुन, फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन, फिर्यादी यांनी वेळोवळी रोख रक्कम व धनादेशाद्वारे एकुण ४३ लाख २५ हजार रुपयांची आर्थिक गुंतवणूक केली असता, नमुद इसमाने फिर्यादी यांना तुम्हांला नफा झाला आहे असे सांगुन, त्यांनी फिर्यादी यांना एकुण दोन टप्प्यामध्ये १० लाख ९५ हजार नफा रक्कम देवून, आणखी रक्कम गुंतविण्यास सांगितली. परंतू फिर्यादी यांचेकडे पुढील गुंतवणुकीसाठी रक्कम नसल्याने फिर्यादी यांनी त्यांना गुंतविलेली रक्कमेची मागणी केली असता, त्यांनी फिर्यादी यांना आजपर्यंत आश्वासन देवुन, अन्यायाने विश्वासघात करुन फिर्यादी यांची एकुण ३२ लाख ३० हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. भोये ९९६९४२९७२८ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ३४६/१८,भादविक ३२६,१४३,१४४,१४७,१४८,१४९,३२१३,५०४ |
| **फिर्यादी** | सिध्दार्थ बनसोडे,वय २१ वर्षे,रा.धानोरी पुणे |
| **आरोपी** | दोन विद्यीसंघर्षीत बालक (ताब्यात) व इतर १० ते ११ |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २४/०५/२०१८ रोजी १८/०० वा.चे सुमारास आंबेडकर कला व वाणिज्य महाविदयालय येरवडा,पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले तारखेस वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे नोकरी करत असलेले महाविदयालय येरवडा पुणे या कॉलेजचे मैदानात नेहमी खेळणारे मुलांपैकी दोन अनोळखी विद्यीसंघर्षीत बालक फिर्यादी यांची ॲक्टीव्हा गाडी ही ओढत असताना दिसल्याने फिर्यादी यांनी त्यास गाडी का ओढतो असे म्हणाले असता,त्याकारणावरून त्यांचे तोंड ओळखीचा |

| | |
|---|---|
| | विद्यीसंघर्षीत बालक व त्यांचे १० ते १५ साथीदार यांनी फिर्यादीस शिवीगाळ करून, एका विद्यीसंघर्षीत बाकल याने त्याचे हातातील चाकुने फिर्यादीचे डावे कानाजवळ मारून व दुसऱ्या विद्यीसंघर्षीत बालकाने लोखंडी रॉडने,लाकडी बॅटने व लाथाबुक्क्यांनी फिर्यादीचे दोन्ही हातावर पायांवर व पाठीवर मारून गंभीर जखमी केले तेंव्हा फिर्यादी यास वाचवणेसाठी कॉलेजचे शिपाई दिलीप कडके व असवरे सर हे गेले असता त्यांना देखील त्यांनी मारहाण केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. मारोडे ९६८९३१५०२० |
| **७** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे १७२/१८,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | दुर्गेश ठाकूर,वय २२ वर्षे,रा. दांगट पाटीलनगर, पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/०५/२०१८ रोजी दुपारी ०२/१० वा.ते दुपारी ०२/२० वा.चे दरम्यान बॅक ऑफ बडोदा काकडे सिटी,कर्वेनगर पुणे च्या समोर फुटपाथ शेजारी |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी,यातील फिर्यादी यांनी फुटपाथ शेजारी त्यांची ॲक्टीव्हा मोटार सायकल ही लॉक करून पार्क केली असता, सदरच्या ॲक्टीव्हा मोटार सायकलच्या डिकीतुन रोख रक्कम सुमारे २ लाख २० हजार रूपये व वडीलांचे बॅकेचे पासबुक व आधारकार्ड कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादी यांचे संमती शिवाय सदर मोटार सायकलची डिकी कशाचेतरी साहयाने अथवा डुप्लीकेट चावीने उघडुन रोख रक्कम २ लाख २० हजार रूपये व वडीलांचे बॅकेचे पासबुक व आधारकार्ड चोरुन नेली आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. त्र्यंबके ९८६०३७०१५१ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**